पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९१२ /२०१४
दिनांक : १४/११/२०१४

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **१९/११/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१९/११/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**कार्यालय अधिक्षक (सभाशाखा)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ०८**

दिनांक : **१९/११/२०१४** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१९/११/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ**)** दिनांक १७/०९/२०१४, ०१/१०/२०१४, १७/१०/२०१४ व ०५/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ५ )** सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ०१/१०/२०१४, १७/१०/२०१४ व ०५/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ६ )** सभावृत्तांत कायम करणे.

क) दिनांक ०५/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ७ )** सभावृत्तांत कायम करणे.

**----------**

**विषय क्र.१)** मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रुंद रस्त्याचे आखणीमध्ये बदल करुन रस्त्यांची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे. सदर प्रस्तावास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३०० दि.२७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावानुसार फेरबदल दर्शविणारा नकाशा उपसंचालक, नगररचना व विकास विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात ठेवणेत आला होता. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला होता. तसेच सदर फेरबदलाची जाहिर नोटीस दि.२१/११/२०१३ च्या दै.लोकमत या मराठी माध्यमाच्या वर्तमानपत्रात व दै.टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी माध्यमाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आली होती. महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.०४/१२/२०१३ नुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिर नोटीशीच्या अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या ३२ हरकती या विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या प्राप्त हरकतधारकांना दि.२१/०४/२०१४ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळेस हरकतधारकांनी नमुद केलेले मुद्दे व हरकती यांचा विचार करुन मनपाचा अभिप्राय त्या बाबतचा अहवाल प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमुद केलेला आहे. सदर फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १९/११/२०१४ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

**विषय क्र.२)** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.५२ मधील काळाखडक, वाकड झोपडपट्टीमध्ये जलनि:सारण नलिका टाकणेकामी येणा-या र.रु.४७,००,०००/- (अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १९/११/२०१४ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

**विषय क्र.३)** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.५२ वाकड मधील आण्णाभाऊ साठेनगर झोपडपट्टीमध्ये जलनि:सारण नलिका टाकणेकामी येणा-या र.रु.२१,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख पन्नास हजार फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १९/११/२०१४ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

**विषय क्र.४)** प्रभाग क्र.३७ मधील बालाजीनगर झोपडपट्टीत ड्रेनेजची मुख्यगुरुत्व नलिका टाकणेकामी येणा-या र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.५)** चिंचवड मैलाशुध्दी प्रकल्पा अंतर्गत प्रभाग क्र.८ मध्ये विद्यानगर, रामनगर, दत्तनगर, व परिसरात आवश्यकतेनुसार भुयारी गटर नलिका टाकणे तसेच इतर जलनि:सारण विषयक आवश्यक सुधारणा कामे करणेकामी येणा-या र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**कार्यालय अधिक्षक (सभाशाखा)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९१२/२०१४
दिनांक : १४/११/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.